नि.दि.दावा क्र.९७/२०२२
संतोष व इतर वि. अमोल व इतर.
CNR No.MHJN090004892022

## नि.क्र.५२ वरील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दावा मिळकतीवरील जैसे थे परिस्थिती ठेवण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथन की, गट क्र.२१० मौजे नानेगाव, ता.बदनापूर, जि.जालना येथील जमीन, क्षेत्र ५ हेक्टर ८७ आर या संदर्भामध्ये प्रतिवादी यांनी वादीच्या ताब्यामध्ये अडथळा करु नये तसेच बेकायदेशीर रस्ता तयार करु नये यासाठी प्रतिवादींना पाबंद करण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये नि.क्र.५ वर आदेश पारीत झालेला असून वादीचा अर्ज नामंजूर करण्यात आलेला आहे. वादीचे प्रकरण हे बांध बंधाऱ्याचे असल्याने दावा मिळकतीची मोजणी करणे आवश्यक आहे. वादीने दाव मिळकतीची कोर्ट कमिशनरव्दारे मोजणी संदर्भामध्ये अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी हे वादीचा नि.क्र.५ वरील आदेश नामंजूर झाल्याने त्याचा गैरफायदा घेऊन वादींना त्रास देऊन त्यांच्या वहितीमध्ये अडथळा निर्माण करीत आहे.

३. वादीचे पुढे कथन की, प्रतिवादी यांनी दि.०९.०७.२०२३ रोजी दावा मिळकतीच्या उत्तरेकडून पूर्व-पश्चिम बाजूस पुन्हा गाडी रस्ता तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. वादी यांनी त्यांना प्रतिबंधित केले असता प्रतिवादींनी त्यांना मारहाण केली व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या. परंतु, प्रतिवादी याने बदनापूर पो.स्टे. येथे जावून वादीविरुध्द खोटी फिर्याद दिली. प्रतिवादी हे दावा प्रलंबित

असताना वादींना, राजकीय दबाव तंत्राचा वापर करुन पोलीस यंत्रणेला हाताशी धरुन खोट्या गुन्ह्यात गोवण्याचा प्रयत्न करीत आहेत. वादीचा मोजणी अर्ज निकाली निघण्यासाठी बराच कालावधी लागू शकतो. तत्पूर्वी, प्रतिवादी यांना दावा मिळकती संदर्भामध्ये जैसे थे आदेशाव्दारे किंवा तुर्तातुर्त मनाई हुकूमाव्दारे पाबंद करणे गरजेचे आहे. असे न झाल्यास प्रतिवादी हे वादींना त्यांच्या ताब्यातून कायमचे बेदखल करतील व वादीचे जवळपास एक एकर शेत रस्त्यामध्ये जाईल. त्यामुळे, त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. वादींनी स्वतःची प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे. वादींच्या बाजूने झुकते माप आहे. प्रतिवादींना पाबंद केले नाहीतर ते वादींच्या शेतातून रस्ता निर्माण करण्यास यशस्वी ठरतील. सबब, वादींनी प्रस्तुतचा अर्ज हा मोजणी अर्ज निर्णयांकीत होईपर्यंत जैसे थे परिस्थिती ठेवून प्रतिवादींना पाबंद करण्याची विनंती केली आहे. तसेच, मोजणी अर्जावर सुनावणी होईपर्यंत किंवा मोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वादींच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम मंजूर करुन प्रतिवादींना पाबंद करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ५, ८ व ९ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.५३ खाली दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, वादींचा प्रस्तुतचा अर्ज हा कायद्याच्या कक्षेत बसत नसल्याने तो फेटाळण्यात यावा. वादीने न्यायालयात दाखल केलेला नि.क्र.५ चा अर्ज नामंजूर झालेला आहे. सदरील आदेशाच्या नाराजीने वादी कोणत्याही वरिष्ठ न्यायालयामध्ये गेलेले नसून अपील दाखल केलेले नाही. वादीला प्रस्तुतच्या न्यायालयामध्ये ते मागणी करीत असलेली मागणी मागण्याचा अधिकार

नाही. वादी हे स्वतः प्रतिवादीला अडथळा निर्माण करीत आहे व त्यांनी प्रतिवादी क्र.१ यांना मारहाण केलेली आहे. प्रस्तुतचे प्रकरण दाखल असतानाही वादी प्रतिवादींना त्यांच्या शेतात जाण्या–येण्यासाठी मज्जाव करीत आहे. वादीला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यासाठी कोणतेही नवीन कारण घडलेले नाही. प्रतिवादीने दावा मिळकतीमध्ये कोणताही बदल केलेला नाही अथवा विक्री केलेली नाही. त्यामुळे, वादीचा अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

५. वादीने अभिलेखावर दि.१०.०७.२०२२ रोजी जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, जालना येथे दिलेली तक्रार दाखल केलेली आहे.

६. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

७. वादी यांनी तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी नि.क्र.५ वर प्रतिवादी यांना प्रतिबंधित करण्यासाठी अर्ज दिला होता. सदरील अर्जावर सुनावणी होऊन आदेश पारीत झालेला असून वादीचा तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर झालेला आहे. अशा परिस्थितीमध्ये, वादींची पुन्हा तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी प्रस्तुतच्या न्यायालयाकडे करणे ही बाब कायद्याच्या कक्षेमध्ये बसत नाही. वादी यांना सदरील आदेशाच्या विरुध्द वरिष्ठ न्यायालयाकडे आक्षेप नोंदविण्याची पूर्ण मुभा असतानाही त्यांनी प्रस्तुतचा त्याच आशयाचा अर्ज प्रस्तुतच्या न्यायालयाकडे दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये, वादीची तात्पुरत्या मनाई हुकूमाची मागणी तसेच

मोजणीचा अर्ज निकाली निघेपर्यंत दावा मिळकतीची जैसे थे परिस्थिती ठेवण्याची मागणी ही योग्य नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by PADMASHRI VASANT RAUT
Date: 2023.07.21 17:54:06 +0530

दि.१७.०७.२०२३. (श्रीमती.पी.व्ही.राऊत)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
बदनापूर.